## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

Date: 15/07/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

### News Paper Name: आपलं महानगर

**Page No. 04**

आपल्या वाढण्या, आतल्या वाढण्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com
पाहता लवकरच झगता महाराष्ट्र पहायला मिळाला तर आश्चर्य वाटू नय.

# दिनविशेष



## प्रखर बुद्धिवादी समाजचिंतक नरहर कुरुंदकर

नरहर कुरुंदकर हे मराठी भाषा व साहित्याचे समीक्षक आणि समाजचिंतक होते. ते एक प्रभावी वक्ते होते. त्यांचा जन्म १५ जुलै १९३२ साली परभणी जिल्ह्यातील नांदापूर (आता हिंगोली जिल्हा) येथे झाला. प्राथमिक शिक्षण वसमतला झाल्यानंतर हैदराबादला त्यांनी पुढचं शिक्षण घेतलं. जागर, रूपवेध, मनुस्मृती, शिवरात्र, अभयारण्य, वाटा तुझ्या माझ्या ही पुस्तकं त्यांनी लिहिली आहेत. किशोरवयीन अवस्थेतच ते हैदराबाद मुक्तिसंग्रामात उतरले होते. त्यांच्यावर साम्यवादी विचारांचा प्रभाव होता. त्यांना १९४८ ला अटकदेखील झाली होती. सुटकेनंतर पुन्हा ते चळवळीत उतरले.

साधारणत: अकराव्या वर्षापासून कुरुंदकरांनी लिखाणाला सुरुवात केली. जेव्हा १९५६ ला बा. सी. मर्ढेकर यांच्यावर त्यांनी लिहिलेल्या समीक्षणाची लेखमाला 'सत्यकथा' या नियतकालिकात प्रसिद्ध झाली तेव्हा ते महाराष्ट्रातील साहित्य वर्तुळात चर्चेचा विषय ठरले. त्यानंतर मुंबईच्या मराठी साहित्य संघाने त्यांना सौंदर्यशास्त्रावर व्याख्यानासाठी बोलवलं होतं. गमतीचा भाग म्हणजे कुरुंदकर तेव्हा इंटर (आताचं बारावी) पास नव्हते तेव्हा त्यांची पुस्तकं बीएला अभ्यासक्रमाला होती. ते मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष होते, ते बीए पास नव्हते त्याआधी ते मराठवाडा विद्यापीठाच्या सिनेटवर होते, एम. ए. पास झाले नव्हते त्याआधी त्यांचा रिचर्ड्सची कलामीमांसा हा संशोधनावर आधारित असलेला ग्रंथ आला होता. त्यावेळी ते नांदेडच्या प्रतिभा निकेतन शाळेत प्राथमिक शिक्षक होते. एम. ए. पूर्ण केल्यानंतर १९६३ मध्ये ते पीपल्स कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून रूजू झाले. ते विद्यार्थीप्रिय शिक्षक होते. १९७७ मध्ये ते पीपल्स कॉलेजचे प्राचार्य झाले. पुढे त्यांना राज्य सरकारचा आदर्श शिक्षक पुरस्कारदेखील मिळाला. ते त्यांच्या कारकिर्दीच्या सर्वोच्च शिखरावर असताना १० फेब्रुवारी १९८२ ला त्यांना स्टेजवरच हृदयविकाराचा झटका आला. त्यात त्यांचा मृत्यू झाला.

Nashik Edition
Jul 15, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC
KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401